-: प्रेसनोट दिनांक - १०/१०/२०२५ :-

आरोपी लोकसेवक ०१) राहुल सहदेव निबांळकर, वय - ३६ वर्षे, पद - दिवाबत्ती कर्मचारी ग्रामपंचायत हेरले,ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर रा. हेरले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, ०२) सुरज जिनगोंडा पाटील, पद- रोजगार सेवक ग्रामपंचायत हेरले,ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर रा. हेरले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........

---

तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे प्रधानमंत्री घरकुल योजने अंतर्गत घरकुल मंजुर झालेले आहे त्याचे प्रलबिंत हफ्ते कधी मिळणार याची विचारणा करणेकरीता तक्रारदार ग्रामपंचायत हेरले, ता. हातकणंगले येथे गेले होते. त्यावेळी तेथे त्यांना ग्रामपंचायत शिपाई राहुल निबांळकर भेटले त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे घरकुलाचे प्रलबिंत असलेले हफ्ते हातकणंगले येथील वरीष्ठ कार्यालयातुन मंजुर करून देतो त्याकरीता तेथील अधिकारी यांना २५,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी क्रमांक ०१ ग्रामपंचायत शिपाई राहुल निंबाळकर याने तक्रारदार यांना त्यांचे घरकुलाचे प्रलंबित हफ्ते वरीष्ठ कार्यालयाकडुन मंजुर करून आणले म्हणुन २५,०००/- रूपयांची लाच मागणी करून तडजोडी अंती २०,०००/- रूपयांची लाच मागणी केल्याचे तसेच आरोपी क्रमांक ०२ सुरज जिनगोंडा पाटील, पद- रोजगार सेवक याने शिपाई राहुल निंबाळकर याने मागणी केले लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे दिल्याचे निष्पन्न झाले

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी क्रमांक ०१ ग्रामपंचायत शिपाई राहुल निंबाळकर याने मागणी केलेप्रमाणे २०,०००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक आरोपी लोकसेवक ०१) राहुल सहदेव निबांळकर, वय - ३६ वर्षे, पद - दिवाबत्ती कर्मचारी ग्रामपंचायत हेरले,ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर रा. हेरले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, ०२) सुरज जिनगोंडा पाटील, पद- रोजगार सेवक ग्रामपंचायत हेरले,ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर रा. हेरले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द हातकणंगले पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री राजेंद्र सानप पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. सुधिर पाटील, पोकॉ संदिप पवार, पो.कॉ. कृष्णा पाटील, पो.कॉ. प्रशांत दावणे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.